Email – dcpsub.traffic@mahapolice.gov.in
दूरध्वनी क्रमांक – ०२२-२६६६७३७६

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
**मुंबई पोलीस**

पोलीस उप आयुक्त, वाहतूक (पश्चिम उपनगरे), मुंबई यांचे कार्यालय, सशस्त्र पोलीस प्रशिक्षण, क्रिडा व कल्याण इमारत, पहिला मजला, १/७, कलिना, सांताक्रुझ चेंबूर लिंक रोड, कलिना युनिव्हर्सिटी समोर, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई – ९८.

जावक क्रमांक - ४९० /पोउपआ/वाहतूक/पश्चिम उपनगरे/ता. अधिसूचना/२०२६, दिनांक – १०/०३/२०२६

## तात्पुरती अधिसूचना / आदेश

अधिसूचना क्रमांक - ७४ /पोउपआ/वाहतूक/पश्चिम उपनगरे/ता. अधिसूचना/२०२६, दिनांक - १० /०३/२०२६

ज्या अर्थी, दहिसर वाहतूक विभागाच्या हद्दीमधील स्वागत को-ऑपरेटिव हाऊसिंग सोसायटी ते भारतीय खाद्य निगम मुख्य प्रवेशद्वार दरम्यानचा दक्षिणोत्तर जाणारा रस्ता हा अरुंद असून त्या मार्गालगत निवासी इमारती आहेत. सदर मार्गावर दोन्ही दिशेने वाहतूक सुरू असते. तसेच, भारतीय खाद्य निगम कार्यालय व गोदाम येथे धान्य वाहतूक करणारी अवजड वाहने नियमितपणे ये-जा करीत असल्याने मार्गावरील वाहतुकीवर ताण निर्माण होत आहे.

आणि ज्या अर्थी, सदर मार्गावर दोन्ही बाजूस दुचाकी व चारचाकी वाहने पार्क केल्यामुळे वाहतुकीची कोंडी निर्माण होऊन अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वाहतूक सुरळीत व सुरक्षित राहावी तसेच अपघात टाळण्याच्या दृष्टीने सदर मार्गावर सम-विषम पद्धतीने पार्किंग निर्बंध लागू करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, अजित बोऱ्हाडे, पोलीस उप आयुक्त, वाहतूक, पश्चिम उपनगर, मुंबई, मला मोटार वाहन अधिनियम, १९८८ (नियम ५९, मोटार वाहन नियम, १९८९) कलम ११५ तसेच शासन निर्णय क्र. MVA ०५८९/CR-१०६१/TR-२ दि. १९/०५/१९८९, MGG IV-A दि. २०/०९/१९९० आणि MVA ००१९६/८७१/CR-३७/CR-२ दि. २७/०९/१९९६, MGG I-V-A Ex-P ३०७ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांनुसार तात्पुरत्या स्वरूपात खालीलप्रमाणे वाहतूक निर्बंध लागू करीत आहे.

**१) रस्त्याचे नाव व हद्द :**

स्वागत को-ऑपरेटिव हाऊसिंग सोसायटी ते भारतीय खाद्य निगम मुख्य प्रवेशद्वार दरम्यानचा दक्षिणोत्तर रस्ता, दहिसर.

**२) पार्किंग निर्बंध :**

- दिनांकाच्या सम तारखांना रस्त्याच्या पूर्व बाजूस वाहन पार्किंग करण्यास परवानगी राहील व पश्चिम बाजूस पार्किंग करण्यास मनाई राहील.
- दिनांकाच्या विषम तारखांना रस्त्याच्या पश्चिम बाजूस वाहन पार्किंग करण्यास परवानगी राहील व पूर्व बाजूस पार्किंग करण्यास मनाई राहील.

सदर आदेश अधिसूचना निर्गमित दिनांकापासून पुढील तीन महिन्यांसाठी लागू राहील. ही अधिसूचना माझ्या शिक्क्यासह व स्वाक्षरीसह दि. १०/०३/२०२६ रोजी मुंबई येथे जारी करण्यात येत आहे.

पोलीस उप आयुक्त वाहतूक, पश्चिम उपनगरे, मुंबई

(अजित बोऱ्हाडे)
पोलीस उप आयुक्त, वाहतूक (पश्चिम उपनगरे)
मुंबई शहर

Email – dcpsub.traffic@mahapolice.gov.in
Phone Number – 022-26667376

सत्यमेव जयते
Govt. of Maharashtra
Home Department
**Mumbai Police**

**Office of the Deputy Commissioner of Police, Traffic (Western Suburbs)**

Armed Police Training, Sports & Welfare Building, 1st Floor, 1/7 Kalina, Santacruz-Chembur Link Road, Opposite Kalina University Santacruz (East), Mumbai – 400 098

**Outward No. 890 /DCP/Traffic/Western Suburbs/Temp. Notification/2026, Dated: 10/03/2026**

## TEMPORARY NOTIFICATION / ORDER

**Notification No. 08 /DCP/Traffic/Western Suburbs/Temp. Notification/2026, Dated: 10 /03/2026**

**Whereas,** the north–south road falling within the jurisdiction of Dahisar Traffic Division, from Swagat Co-operative Housing Society to the main entrance of the Food Corporation of India, is narrow and is flanked by residential buildings. Vehicular traffic moves in both directions on the said road. Further, as the office and godown of the Food Corporation of India are situated at the said location, heavy vehicles transporting food grains regularly ply on this stretch, thereby putting pressure on the traffic movement.

**And whereas,** parking of two-wheelers and four-wheelers on both sides of the said road leads to traffic congestion and the possibility of accidents cannot be ruled out. In order to maintain smooth and safe traffic flow and to prevent accidents, it is necessary to implement alternate (odd–even) parking restrictions on the said road.

**Now, therefore,** I, Ajit Borhade, Deputy Commissioner of Police, Traffic (Western Suburbs), Mumbai, in exercise of the powers vested in me under Section 115 of the Motor Vehicles Act, 1988 read with Rule 59 of the Central Motor Vehicles Rules, 1989, and in accordance with Government Resolutions No. MVA 0589/CR-1061/TR-2 dated 19/05/1989, MGG IV-A dated 20/09/1990, and MVA 00196/871/CR-37/CR-2 dated 27/09/1996, MGG I-V-A Ex-P 307, do hereby temporarily impose the following traffic restrictions:

1. **Name and extent of road:**
   North–south road from Swagat Co-operative Housing Society to the main entrance of the Food Corporation of India, Dahisar.

2. **Parking restrictions:**
   • On even dates, parking of vehicles shall be permitted on the eastern side of the road and prohibited on the western side.
   • On odd dates, parking of vehicles shall be permitted on the western side of the road and prohibited on the eastern side.

This order shall remain in force for a period of three months from the date of issuance of this notification.

This notification is issued under my seal and signature at Mumbai on date 10/03/2026.

DEPUTY COMMISSIONER OF POLICE, TRAFFIC, WESTERN SUBURBAN, MUMBAI

(Ajit Borhade)
DCP Traffic (Western Suburbs)
Mumbai City

Email – dcpsub.traffic@mahapolice.gov.in
दूरध्वनी क्रमांक – ०२२-२६६६७३७६

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
गृह विभाग
**मुंबई पोलीस**

पोलीस उप आयुक्त, वाहतूक (पश्चिम उपनगरे), मुंबई यांचे कार्यालय, सशस्त्र पोलीस प्रशिक्षण, क्रिडा व कल्याण इमारत, पहिला मजला, १/७, कलिना, सांताक्रुझ चेंबूर लिंक रोड, कलिना युनिव्हर्सिटी समोर, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई – ९८.

जा क्र - ४१० /पोउपआ/वाहतूक/पश्चिम उपनगरे/ता. अधिसूचना/२०२६, दिनांक – १०/०३/२०२६

## वृत्तपत्र सूचना

## मुंबई पोलीस – वाहतूक विभाग, पश्चिम उपनगर

दहिसर वाहतूक विभागाच्या हद्दीतील स्वागत को-ऑपरेटिव हाऊसिंग सोसायटी ते भारतीय खाद्य निगम (FCI) मुख्य प्रवेशद्वार दरम्यानचा दक्षिणोत्तर जाणारा रस्ता अरुंद असून त्या मार्गालगत निवासी इमारती आहेत. सदर मार्गावर दोन्ही दिशेने वाहतूक सुरू असते. तसेच भारतीय खाद्य निगम कार्यालय व गोदाम येथे धान्य वाहतूक करणारी अवजड वाहने नियमितपणे ये-जा करीत असल्याने मार्गावरील वाहतुकीवर ताण निर्माण होत आहे.

याशिवाय, सदर मार्गावर दोन्ही बाजूस दुचाकी व चारचाकी वाहने पार्क केल्यामुळे वाहतुकीची कोंडी निर्माण होण्याची तसेच अपघात होण्याची शक्यता निर्माण होत आहे. त्यामुळे वाहतूक सुरळीत व सुरक्षित राहावी तसेच अपघात टाळण्याच्या दृष्टीने सदर मार्गावर **सम-विषम पद्धतीने पार्किंग निर्बंध** लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे पार्किंग व्यवस्था लागू करण्यात येत आहे :

**१) रस्त्याचे नाव व हद्द :** स्वागत को-ऑपरेटिव हाऊसिंग सोसायटी ते भारतीय खाद्य निगम मुख्य प्रवेशद्वार दरम्यानचा दक्षिणोत्तर रस्ता, दहिसर पूर्व.

**२) पार्किंग निर्बंध :**

- दिनांकाच्या **सम तारखांना** रस्त्याच्या **पूर्व बाजूस वाहन पार्किंग करण्यास परवानगी** राहील व **पश्चिम बाजूस पार्किंग करण्यास मनाई** राहील.
- दिनांकाच्या **विषम तारखांना** रस्त्याच्या **पश्चिम बाजूस वाहन पार्किंग करण्यास परवानगी** राहील व **पूर्व बाजूस पार्किंग करण्यास मनाई** राहील.

सदर व्यवस्था **अधिसूचना निर्गमित दिनांकापासून पुढील तीन महिन्यांसाठी** लागू राहील.

वाहनचालक व स्थानिक नागरिकांनी सदर वाहतूक व्यवस्थेचे पालन करून वाहतूक पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

पोलीस उप आयुक्त वाहतूक, पश्चिम उपनगरे, मुंबई

(अजित बोऱ्हाडे)
पोलीस उप आयुक्त, वाहतूक (पश्चिम उपनगरे)
मुंबई शहर

Email – dcpsub.traffic@mahapolice.gov.in
Phone Number –022-26667376

सत्यमेव जयते
Govt. of
Maharashtra
Home Department
**Mumbai Police**

**Office of the Deputy Commissioner of Police, Traffic (Western Suburbs)**
Armed Police Training, Sports & Welfare Building, 1st Floor, 1/7 Kalina, Santacruz-Chembur Link Road,
Opposite Kalina University Santacruz (East), Mumbai – 400 098

Outward No. 410 /DCP/Traffic/Western Suburbs/Temp. Notification/2026, Dated: 10/03/2026

# PRESS RELEASE

## (Mumbai Traffic Police – Western Suburbs Division)

The road in between **Swagat Co-operative Housing Society and the main entrance of the Food Corporation of India (FCI)** within the jurisdiction of Dahisar Traffic Division is narrow and flanked by residential buildings. Traffic movement takes place in both directions on this road. In addition, heavy vehicles transporting food grains frequently visit the FCI office and godown, resulting in increased traffic load on the said road.

Further, parking of two-wheelers and four-wheelers on both sides of the road leads to traffic congestion and increases the possibility of accidents. In order to ensure smooth and safe movement of traffic and to prevent accidents, **alternate (odd–even) parking restrictions** have been introduced on this road.

The parking arrangement will be as follows:

**1) Name and stretch of road:** North–South road between Swagat Co-operative Housing Society and the main entrance of Food Corporation of India (FCI), Dahisar.

**2) Parking Restrictions:**

- On **even dates**, parking of vehicles will be **permitted on the eastern side** of the road and **prohibited on the western side**.
- On **odd dates**, parking of vehicles will be **permitted on the western side** of the road and **prohibited on the eastern side**.

These arrangements will remain in force **for a trial period of three months from the date of issuance of the notification**.

Motorists and local residents are requested to follow the above traffic regulations and cooperate with the Traffic Police.

DEPUTY COMMISSIONER OF POLICE, TRAFFIC, WESTERN SUBURBAN, MUMBAI

**(Ajit Borhade)**
DCP Traffic (Western Suburbs)
Mumbai City